# “तळबीड येथील मोहिते घराण्याचा इतिहास

# (इ.स.१६०० ते इ.स.१७०७): एक ऐतिहासिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील इतिहास विषयाच्या

पीएच. डी. पदवीसाठी सादर करण्यात आलेला

**शोधप्रबंधाचा आराखड**


✻ संशोधक ✻

प्रा.शशिकांत महादेव मोहिते,

एम.ए. सेट

इतिहास विभाग,

आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,आष्टा

ता.वाळवा,जि.सांगली-४१६३०१

✻ मार्गदर्शक ✻

प्रा.डॉ.आर.डी.गंगथडे,

एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.

प्रमुख, इतिहास विभाग,

कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती,

ता.अहमदपूर, जि.लातूर.


सन २०१६

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १-२ |
| २ | विषय निवडीचे महत्त्व | २ |
| ३ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | २-३ |
| ४ | गृहितके | ३-४ |
| ५ | संशोधन पध्दती | ४ |
| ६ | प्रकरण निहाय आराखडा - | ४ |
| | १) मराठी सत्तेच्या उदयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी | ४ |
| | २) तळबीडकर - मोहिते घराण्याचा उदय | ४ |
| | ३) सरसेनापती हंबीरराव मोहिते भाग-१ | ५ |
| | ४) सरसेनापती हंबीरराव मोहिते भाग-२ | ५ |
| | ५) तळबीडकर - मोहिते घराण्यातील कर्तबगार स्त्रिया | ५ |
| | ६) निष्कर्ष | ५ |
| ७ | संदर्भ साधने | ६-८ |

✻ प्रस्तावना :

१७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात सह्याद्रीच्या कुशीत “हिंदवी” स्वराज्याची स्थापना केली. ही घटना केवळ मराठ्यांच्या किंवा भारताच्या इतिहासातील नव्हे तर अखिल मानव जातीच्या इतिहासातील विलक्षण अद्‌भुत घटना मानावी लागते. कारण या घटनेत महान मानवी मूल्यांचे अनेक कंगोरे सामावलेले आहेत. वर्षानुवर्षे परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली गुलामगिरीचे जीवन जगणाऱ्या मराठी समाजाच्या मनात छ.शिवरायांनी आपल्या असामान्य पराक्रमातून नवचैतन्य निर्माण केले. मराठ्यांना स्वाभिमानाने जगण्याची शिकवण दिली. स्वतंत्र व सार्वभौम राज्याच्या निर्मितीसाठी त्यांनी मराठ्यांची आस्मिता जागृत केली. अनेक कठीण प्रसंगी स्वतःच्या जीवावर उदार होऊन संकटांवर मात केली. स्वातंत्र्याचे उदात्त ध्येय उराशी बाळगून ते साध्य करण्यासाठी एखाद्या निष्काम कर्मयोग्यासारखे किंवा उपभोगशून्य स्वामी सारखे महाराज सतत लढत राहिले. अचाट पराक्रमातून, उच्च नितीमत्तेतून त्यांनी स्वतःचा नवा आदर्श लोकांसमोर निर्माण केला.

‘हिंदवी’ स्वराज्याची निर्मिती ही राजांची सर्वात महनीय कामगिरी होय. या कामगिरीत मानवी जीवनातील महत्तम पराक्रम, अद्‌भूत धाडस, विलक्षण चिकाटी, असामान्य मनोधैर्य, धीरोदात्त वृत्ती, विवेकी सहनशीलता, श्रेष्ठ मुत्सद्देगिरी, उच्च नितिमत्ता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता इ. अनेक प्रकारच्या सद्‌गुणांचे दर्शन घडते. शून्यातून नुतन सृष्टी निर्माण करावी ऐवढे मोठे हे काम होते. अवती-भोवती बलाढ्य शत्रूंचा प्रदेश, स्वकीय वतनदारांचा प्रचंड विरोध, राज्य स्थापनेसाठी लागणाऱ्या संसाधनांचा अभाव अशा प्रतिकूल परिस्थितीतही राजांनी राज्य स्थापन केले. हे फार मोठे आश्चर्य होय. वास्तविक शहाजी राजांकडून वारसाहक्काने प्राप्त झालेल्या जहागीरीचा अपवाद वगळता राजांकडे राज्यनिर्मितीसाठी लागणारी साधने फारशी उपलब्ध नव्हतीच. शिस्तबध्द लष्कर, गडकोट, खजिना, राजधानी, निष्ठावंतांचा मोठा वर्ग या सर्व बाबी त्यांना निर्माण कराव्या लागल्या. या पार्श्वभूमीवर समाजातील कोण कोणत्या घटकांनी महाराजांना स्वराज्य निर्मितीत मदत केली? सर्वसामान्य माणसांचे या प्रक्रियेत योगदान किती? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्या काळातील कोण-कोणत्या घराण्यांनी स्वराज्याचे आधारस्तंभ म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली? या प्रश्नांचा उहापोह होणे आवश्यक वाटते.

‘हिंदवी’ स्वराज्याची संकल्पना, वाटचाल, स्वरूप व निर्मिती या सर्व बाबींचा केंद्रबिंदू म्हणजे छ.शिवाजी महाराजच होय. परंतु स्वराज्याच्या जडणघडणीत मावळ प्रांतातील अनेक घराण्यांचा वाटा मोलाचा आहे. तत्कालीन राजकीय-सामाजिक व आर्थिक परिस्थितीच्या परिणामातून अपरिहार्यपणे महाराष्ट्रात अनेक पराक्रमी व्यक्ती व त्यांची घराणी पुढे आली. तत्कालीन सरंजामशाही व्यवस्थेत एखाद्या व्यक्तीने लढाईत पराक्रम गाजविला की, त्याला ‘इनाम’ रूपात वतन किंवा जमीन मिळत असे. काळाच्या ओघात या जमिनीचे रूपांतर मोठ्या जहागीरीत होत असे. ही जहागीर धारण करणारे जहागीरदार, वतनदार मोठ्या जमिनीचे आणि बड्या लष्कराचे अधिपती बनत असत. सुलतानांचा आणि या जहागीरदारांचा संबंध केवळ जमीन महसुलापुरताच येत असे. त्यामुळे ही जहागीरदार मंडळी स्वत:च्या जहागीरीत स्वतंत्र ‘राजेच’ असत. दुर्दैवाने शिवपूर्वकाळात या जहागीरदारांना सुलतानांची चाकरी करण्यात आणि त्यांच्या तख्तासाठी स्वत:चे रक्त सांडण्यात अभिमान वाटत असे. मावळ प्रांतात वंशपरंपरागत जहागीरदारांची अशी अनेक घराणी होती. त्यामध्ये जेधे, मोरे, भोसले, जाधव, यादव, महाडिक, निंबाळकर, घोरपडे, गुजर, घाटगे, माने, शिर्के, जगताप, शिलिमकर, बांदल इ. या प्रमुख घराण्यांचा उल्लेख करावा लागेल. यापैकी काही घराण्यांचा अपवाद वगळता इतर घराण्यांनी स्वराज्याचा जडणघडणीत निश्चितच मोलाचा वाटा उचलला आहे. तथापि उपरोक्त घराण्यांसारखी पार्श्वभूमी न लाभलेली परंतु स्वराज्याच्या निर्मितीत, वाटचालीत आणि संरक्षणात सिंहाचा वाटा उचलणारे एक घराणे म्हणजे तळबीडकर-मोहिते घराणे होय. कराड परगण्यातील कर्यात तळबीड येथील मोहिते घराण्यातील पराक्रमी स्त्री-पुरूषांनी मराठेशाहीचा इतिहास घडविला. त्यामुळे या घराण्याचे मराठ्यांच्या इतिहासातील योगदान अभ्यासण्यासाठी, इतिहासातील त्यांचे स्थान निश्चित करण्यासाठी, इतिहासातील महत्त्व अधोरेखीत करण्यासाठी हा विषय प्रस्तुत शोधप्रबंधासाठी निवडण्यात आलेला आहे.

**✻ विषय निवडीचे महत्त्व:**

शिवकालीन मराठ्यांच्या इतिहासामध्ये वर नमूद केलेल्या वेगवेगळ्या घराण्यांपैकी मोरे, घोरपडे, सुर्वे यासारखे काही अपवाद वगळले तर इतर घराण्यांचे योगदान मान्यच करावे लागते. परंतु तळबीडकर-मोहिते घराणे व्यापक अर्थाने इतर सर्व घराण्यांपेक्षा वेगळे आणि वैशिष्टपूर्ण ठरते. वास्तविक तळबीडकर-मोहिते हे सर्व सामान्य परिस्थितीतून पुढे आलेले घराणे होते. सुरूवातीला तळबीडच्या पाटीलकीचे वतन सोडले तर

फार मोठी जहागीर किंवा संरजाम मोहिते घराण्याकडे नव्हता. परंतु स्वकर्तबगारीवर मोहित्यांनी स्वराज्यामध्ये मोठे यश संपादन केले. सामान्य पाटील ते राज्यसंरक्षक-राज्यकर्ते आणि राज्यनिर्माते हा मोहित्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. ज्या-ज्या वेळी स्वराज्यावर जीवघेणी संकटे कोसळली त्या-त्या वेळी या घराण्यातील थोर स्त्री-पुरूषांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून स्वराज्याचे संरक्षण केले. मोहिते घराण्याचा इतिहास म्हणजे स्वहिताच्या संकुचित स्वार्थापेक्षा राष्ट्रहितासाठी त्यागाची व्यापक शिकवण देणारा इतिहास आहे.

सरसेनापती हंबीरराव मोहिते आणि महाराणी ताराबाई यांचे यासंदर्भातील कार्य वाखाणण्याजोगे आहे. या घराण्याचा तेजस्वी आणि उज्ज्वल इतिहास वर्तमान व भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्त्रोत बनावा, स्फूर्तीदायी ठरावा म्हणून या विषयामध्ये संशोधन होणे गरजेचे आहे. मोहिते घराण्यातील व्यक्तींचा पराक्रम, कर्तृत्व, त्याग, स्वामीनिष्ठा, नि:स्वार्थीपणा, कार्यक्षमता, कर्त्यव्यदक्षता इ. गुण 'मूल्य' म्हणून समाजात रूजावेत यासाठी प्रस्तुत विषयात संशोधन होणे आवश्यक वाटते.

**✻ संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

कोणत्याही संशोधन प्रक्रियेत संशोधनाची काही निश्चित उद्दिष्ट्ये असावी लागतात. प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये निश्चित केलेली आहेत.

१) मराठी सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी समजावून घेणे. मराठी सत्तेच्या उदयातील विविध घराण्यांची भूमिका अभ्यासणे.

२) मराठी सत्तेच्या उदयातील तळबीडकर -मोहिते घराण्याचे योगदान अभ्यासणे.

३) मोहिते घराण्याचा समग्र इतिहास, इतर घराण्यांच्या तुलनेने कसा वेगळा ठरतो हे अभ्यासणे.

४) मोहिते-भोसले वैवाहिक संबंध व त्या संबंधांचा मोहिते-भोसले घराण्यांना झालेला राजकीय फायदा याचा आढावा घेणे.

५) मोहिते घराण्यातील रतोजी, तुकोजी, संभाजी, धारोजी व हंबीरराव या पराक्रमी पुरूषांच्या कार्याचा अभ्यास करणे.

६) मोहिते घराण्यातील तुकाबाई, सोयराबाई आणि रणरागिणी महाराणी ताराबाई या स्त्रियांच्या कर्तबगारीवर प्रकाश टाकणे.

७) छ.शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर स्वराज्याच्या दृष्टिने ऐन कसोटीच्या क्षणी, आणीबाणीच्या प्रसंगी सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी घेतलेल्या भूमिकेचे परीक्षण करणे.

८) मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दातील महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाचा युध्दकौशल्याचा व रणनीतीचा चिकित्सक अभ्यास करणे.

**✻ गृहितके** :

संशोधनामध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने उद्दिष्ट्यांएवढीच गृहितके सुध्दा महत्त्वाची असतात. प्रस्तुत शोध प्रबंधासाठी पुढील गृहितके गृहित धरण्यात आलेली आहेत.

१) तळबीडकर-मोहिते घराणे सर्वसाधारण परिस्थितीतून पुढे आले. तळबीडच्या साध्या पाटीलकीच्या वतनापासून राज्यसंरक्षक, राज्यकर्ते आणि राज्यनिर्माते या अत्युच्च पदापर्यंत पोहचले.

२) तळबीडकर -मोहिते घराण्याचा इतिहास मराठ्यांच्या इतिहासातील एक वेगळा, मोठा व स्वतंत्र ‘अध्याय’ ठरतो.

३) तळबीडकर-मोहिते घराण्याने दिर्घकाळ स्वराज्याची लष्करी बाजू समर्थपणे, सक्षमतेने हाताळली. सरसेनापती हंबीरराव मोहिते आणि महाराणी ताराबाई यांनी लष्करी क्षेत्रात परिस्थितीनिरूप नव-नवीन युध्दतंत्रे सुरू केली.

४) तळबीडकर-मोहिते घराण्याने शहाजी राजे, छ.शिवाजी महाराज, छ.संभाजी महाराज यांची शेवटपर्यंत नि:स्वार्थीपणे, स्वामीनिष्ठेने सेवा केली. त्यातून या दोन घराण्यांमध्ये वैवाहिक संबंधाचा पाया घातला गेला.

५) सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी छ.शिवाजी महाराजाच्या काळात चौफेर युध्दमोहिमांचे आयोजन करून ठिकठिकाणी शत्रूंचा पराभव केला.

६) छ.शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर निर्माण झालेल्या अंतर्गत सत्ता संघर्षात सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी अंत्यत योग्य, नि:स्वार्थी, निरपेक्ष व सद्‌विवेकवादी भूमिका घेतली. त्यामुळेच स्वराज्यावरील अंतर्गत कलहाचे संकट टळून स्वराज्याचे अस्तित्व टिकून राहिले.

७)	छ.संभाजी महाराजांचा पाठीराखा म्हणून हंबीररावांनी निर्णायक भूमिका पार पाडली. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुध्दातील पहिल्या पाच-सहा वर्षांचा इतिहास हंबीररावांच्या शौर्याचा, पराक्रमाचा व लढायांचा इतिहास ठरतो.

८)	मोहिते घराण्यातील तुकाबाई-सोयराबाई व महाराणी ताराबाई या स्त्रियांनी कौटुंबिक जीवनाच्या चाकोरीबाहेर जाऊन राजकारणात दखल घेण्याजोगा सहभाग नोंदविला.

९)	महाराणी ताराबाई यांनी त्यांचे पती छ.राजाराम महाराजांच्या मृत्युनंतर स्वातंत्र्य युध्दाचा शेवट होईपर्यंत अत्यंत सक्षमपणे, कुशलतेने मराठ्यांचे नेतृत्व केले. औरंगजेबाच्या विळख्यातुन स्वराज्याचे रक्षण करण्याचे महान कार्य पार पाडले. एवढेच नव्हे तर मराठी सत्तेचे साम्राज्यात रूपांतर करण्याच्या दृष्टिने पहिले पाऊल उचलणारी शासिका म्हणून महाराणी ताराबाईंकडे पहावे लागते.

**✻ संशोधन पध्दती :**

प्रत्येक विद्याशाखेची एक नियमबध्द संशोधन पध्दती असते. सामाजिक शास्त्रातील – **म**इतिहास**फ** विषयाची देखील एक विशिष्ट प्रकारची **म**ऐतिहासिक संशोधन पध्दती**फ** आहे. त्यामध्ये कागदपत्रे, कागदपत्रांचे परीक्षण, कालनिर्णय, तर्कशुध्द विश्लेषण, सामान्यीकरण, कार्यकारणभाव आणि अन्वयार्थ निरूपन या बाबींचा समावेश होतो. प्रस्तुत संशोधनासाठी समकालीन, प्राथमिक संदर्भ साधनांचा आणि गरजेनुसार दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घेतला जाईल. उपलब्ध कागदपत्रांचे अंतरंग व बहिरंग परीक्षण करून कागदपत्रांची सत्यासत्यता पडताळून मगच संशोधनासाठी कागदपत्रांचा उपयोग केला जाईल. प्रस्तुत संशोधनाचा विषय पुनर्विश्लेषनात्मक असल्यामुळे सदर संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीच्या ’विश्लेषणात्मक संशोधन’ या प्रकाराचा उपयोग केला जाईल. संदर्भ साधने आणि ऐतिहासिक स्थळे धुंडाळण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचाही अवलंब केला जाईल. तसेच विविध संदर्भांसाठी संदर्भ पध्दतीचा जास्तीत जास्त उपयोग केला जाईल. प्रस्तुत संशोधनात अर्नाल्ड टॉयन्बीच्या ‘आव्हान-प्रतिसाद’ सिध्दांतानुसार अन्वयार्थ निरूपण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

**✻ प्रकरण निहाय आराखडा :**

संशोधन कार्यात संशोधन विषयातील अनेक पैलुंचा बारकाईने अभ्यास करावा लागतो. त्यासाठी प्रकरणनिहाय संशोधन विषयाचा आराखडा तयार करावा लागतो. प्रस्तुत शोधप्रबंधाची विभागणी सहा प्रकरणामध्ये केली जाईल.

**✻ प्रकरण पहिले : मराठी सत्तेच्या उदयाची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी**

या प्रकरणात मराठी सत्तेच्या उदयातील ऐतिहासिक व भौगोलिक घटकांचा विचार केला जाईल.तत्कालीन दक्षिणेतील राजकीय परिस्थिती आणि त्या अनुषंगाने दक्षिणेतील निजामशाही आणि आदिलशाही सत्तांचे स्वरूप, त्यांचे मुघलांशीअसलेले शत्रुत्वाचे संबंध आणि त्यातून निर्माण झालेल्या परिस्थितीतून उदयास आलेल्या विविध घराण्यांचा अभ्यास केला जाईल. तत्कालीन दुर्गम भौगोलिक परिस्थितीचा या घराण्यांना झालेला लाभ आणि या घराण्यांचे मराठी सत्तेच्या उदयातील योगदान याचा अभ्यास केला जाईल.

**✻ प्रकरण दुसरे : तळबीडकर –मोहिते घराण्याचा उदय**

या प्रकरणात तळबीडकर मोहिते घराण्याचा उदय, मोहिते-भोसले घराण्यातील संबंध मोहिते घराण्याचा मूळ पुरूष रतोजी मोहिते यांचा पराक्रम, रतोजीपुत्र तुकोजीचे कार्य, तुकोजीपुत्र संभाजी आणि धारोजी यांचा पराक्रम, शहाजी राजांच्या काळातील संभाजीचे कार्य, सुपे परगण्याचा कारभार, शिवाजी-संभाजी मोहिते संबंध इ. बाबींचा उहापोह करण्यात येईल.

**✻प्रकरण तिसरे : सरसेनापती हंबीरराव मोहिते भाग-१**

या प्रकरणात छ.शिवाजी महाराजांच्या काळातील सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कार्याचा आढावा घेतला जाईल. हंबीररावांची सरसेनापतीपदावरील नेमणूक, राज्याभिषेकानंतर हंबीररावांची चौफेर घोडदौड, विशेषत: कर्नाटक प्रांतातील पराक्रम, मराठा लष्कराची रचना,हंबीररावांचे लष्करी प्रभुत्व, युध्दकौशल्य इ. बाबींचा उहापोह करण्यात येईल.

**✻ प्रकरण चौथे : सरसेनापती हंबीरराव मोहिते भाग-२**

या प्रकरणात छ.शिवाजी महाराजांचा मृत्यू आणि संभाजी राजांचे राज्यारोहन यादरम्यानच्या काळातील अंतर्गत कलहाच्यावेळी हंबीररावांनी घेतलेल्या भूमिकेची चिकित्सा केली जाईल. छ.संभाजी महाराजांच्या काळातील हंबीररावांचा लढा, छत्रपतींना त्यांनी केलेले मार्गदर्शन, आयुष्याच्या अखेरपर्यंत दिलेली मौलिक साथ, हंबीररावांचा शेवट आणि इतिहासातील त्यांचे स्थान इ. गोष्टींचा आढावा घेतला जाईल.

**✻ प्रकरण पाचवे : तळबीडकर मोहिते घराण्यातील कर्तबगार स्त्रिया**

या प्रकरणात मोहिते घराण्यातील तुकाबाई, सोयराबाई आणि महाराणी ताराबाई या स्त्रियांच्या कामगिरीचा आढावा घेतला जाईल. तुकाबाईंचा शहाजी राजांवरील प्रभाव, राजकारणातील सहभाग यावर प्रकाश टाकला जाईल. पट्टराणी सोयराबाई यांच्या राजकारणातील भूमिकेचे चिकित्सक परीक्षण केले जाईल. महाराणी ताराबाईंचे नेतृत्व, युध्दकौशल्य आणि स्वातंत्र्ययुध्दातील भूमिका इ. बाबींचा अभ्यास केला जाईल.

**✻ प्रकरण सहावे : निष्कर्ष**

या प्रकरणात मोहिते घराण्याच्या एकूण कामगिरीचे समग्र विवेचन केले जाईल. मोहिते घराण्यातील पराक्रमी व्यक्तींनी स्वराज्याच्या उदयात संकटकाळात कशा पध्दतीने शेवटपर्यंत स्वामिनिष्ठेने काम केले याचा आढावा घेतला जाईल. साध्या पाटीलकीच्या वतनापासुन ते राज्यसंरक्षक, राज्यकर्ते, राज्यनिर्माते या अत्युच्च पदापर्यंत गरूडभरारी कशी घेतली आणि स्वराज्याच्या इतिहासात मोहित्यांचा वेगळा अध्याय कसा निर्माण केला या सर्व बाबींचे तर्कशुध्द विश्लेषण करून मोहित्यांचे इतिहासातील स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केला जाईल.

# संदर्भ साधने


## प्राथमिक संदर्भ साधने :

**✻ संस्कृत साधने -**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | राजवाडे वि.का.(संपा.) | - | जयराम पिंडेकृत राधामाधवविलासचंपू |
| २) | दिवेकर स.म.(संपा.) | - | जयराम पिंडेकृत पर्णालपर्वतग्रहणाख्याणम्. |
| ३) | दिवेकर स.म. आणि आपटे द.वि.(संपा.) | - | कविपरमानंदकृत शिव भारत. |
| ४) | बेंद्रे वा.सी.(संपा.) | - | केशव पंडितकृत राजारामचरितम्. |
| ५) | आपटे द.वि. आणि दिक्षित का.ना.(संपा.) | - | गो.ना.बर्वेकृत शिवराज्याभिषेक कल्पतरू. |

**✻ फारशी साधने -**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आदाब –इ-आलमगिरी. | - | फारशी पत्रसंग्रह |
| २) | इन्शा-इ-हफ्त अंजुमन. | | |
| ३) | दुर्ज-उल-गवाहिर. | | |
| ४) | खुतत-इ-शिवाजी. | | |
| ५) | वारिस मुहम्मद | - | पादशाहनामा. |
| ६) | लाहोरी अब्दुलहमीद | - | बादशाहनामा, इंग्रजी भाषांतर एशियाटीक सोसायटी, बंगाल. |
| ७) | मुहम्मद काजिम | - | आलमगीरनामा. |
| ८) | मुस्तैदखान साकी | - | मासिरे आलमगीरी, मराठी अनु.सेतु माधवराव पगडी, मराठे आणि औरंगजेब. |
| ९) | सक्सेना भीमसेन | - | तारीख-ए-दिल्कुशा, मराठी अनु.सेतु माधवराव पगडी, मोगल आणि मराठे. |
| १०) | नागर ईश्वरदास | - | फतुहाते -आलमगिरी, मराठी अनु.सेतु माधवराव पगडी, मोगल - मराठा संघर्ष. |
| ११) | खाफीखान महंमद हाशिम | - | तारीख-ए-खाफीखान, मराठी अनु.सेतु माधवराव पगडी, मराठ्यांचे स्वातंत्र्य युध्द. |
| १२) | जहुरी मुल्ला जहूरइब्न | - | मुहम्मदनामा |
| १३) | नरूल्ला | - | तारीख-इ-अली आदिलशाही. |
| १४) | नुस्त्रती, मुहम्मद(उर्दु) | - | अलीनामा. |
| १५) | नुस्त्रती मुल्ला | - | तारीखे-इस्कंदरी, मराठी अनु. मु. मा.जगताप. |
| १६) | कुजुनी अस्तराबादी | - | फुतुहात-इ-आदिलशाही. |

✻ मराठी साधने :

१) श्री.साने का.ना.(संपा.)

श्री.जोशी श.ना. (संपा.) – कृष्णाजी अनंत सभासदकृत श्री शिवप्रभुंचे चरित्र.

श्री.पठाण यु.म. (संपा.)

श्री. कुलकर्णी भिमराव(संपादक)

२) श्री. वाकसकर वि.स.(संपादक) – दत्ताजी वाकेनविसकृत ९१ कलमी बखर.

३) श्री. साने का.ना. (संपा.) – रघुनाथ चित्रगुप्तेकृत चित्रगुप्त बखर.

४) श्री. साने का.ना. आणि श्री. हेरवाडकर र.वि.(संपा.) – चिटणीसकृत श्री शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र आणि श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र.

५) श्री. ढेरे रा.चि. आणि श्री.नंदुरबारकर पा.रा.(संपा.) – श्रीशिवदिग्विजय

६) श्री. खरे ग.ह.(संपादक) - ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ ते ६, भा.इ.स.म.पुणे.

७) श्री. खरे ग.ह. आणि श्री.देसाई पा.भि.(संपा.) – शिवचरित्र वृत्तसंग्रह खंड १ ते ३.

८) श्री. केळकर न.चि. आणि श्री. आपटे द.वि. (संपा.) – शिवचरित्र निबंधावली.

९) श्री. गर्गे स.मा.(संपा.) - करवीर रियासतीची कागदपत्रे, खंड १ ते ४

१०) श्री. गुजर मा.वि. (संपा.)- करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, खंड १ ते ८

११) श्री. मोडक ज.ब.(संपा.)-मराठा साम्राज्याची छोटी बखर.

१२) श्री. पवार आप्पासाहेब (संपा.) – ताराबाईकालीन कागदपत्रे खंड १ ते ३

१३) श्री.पारसनीस द.ब. आणि श्री.मावजी पु.वि. (संपा.) – वतनपत्रे, निवाडापत्रे वगैरे, सनदापत्रातील माहिती

१४) श्री. पारसनीस द.ब., श्री.मावजी पु.वि. आणि श्री.वाड सी.जी.(संपा.) – तह, करारमदार आणि कैफियत व यादीज.

१५) श्री. राजवाडे वि.का.(संपा.)- मराठ्यांच्या इतिहासांची साधने -खंड ९ ते २२

१६) श्री.जोशी श.ना.(संपा.)- राजवाडे लेखसंग्रह भाग १ ते ३

१७) श्री. पुरंदरे कृ.वा.(संपा.)-पुरंदरे दप्तर भाग १ ते ३

१८) श्री.आपटे द.वि. व श्री. ओतूरकर र.वि.(संपा.)- महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास.

१९) श्री.आपटे द.वि. व श्री. ओतूरकर र.वि.(संपा.)- शिवचरित्रप्रदिप

२०) श्री.भावे वि.ल. - मराठी दप्तर रूमाल १ ते ३.

२१) श्री. बेंद्रे वा.सी. - महाराष्ट्र इतिहासाची साधने खंड १ ते ३

२२) भा.इ.स.म.पुणे- ऐतिहासिक संकीर्ण निबंध, ऐतिहासिक संकीर्ण साहित्य खंड १ ते १६, ऐतिहासिक स्फुटलेख भाग १ ते ५, निवडक लेख खंड २, अहवाल, शिवचरित्र साहित्य खंड १ ते १६ इत्यादी

२३) शिवचरित्र कार्यालय, पुणे-शिवचरित्र पत्रसार संग्रह.

✻ मासिके :

१) श्री देव श.श्री. (संपा.) – इतिहास आणि ऐतिहासिक (तळबीडकर -मोहिते दप्तर संदर्भ)

२) श्री.पारसनीस द.बा.(संपा.) – इतिहास संग्रह

३) श्री. मोडक ज.ब. व श्री.साने का.ना.(संपा.) – काव्येतिहास संग्रह

४) श्री.विजापूरकर वि.गो. – ग्रंथमाला.

५) श्री.चांदोलकर गोविंद – पुरुषार्थ.

६) श्री.पारसनीस द.बा. व श्री.आपटे ह.ना.(संपा.) - भारत वर्ष.

**✻ पोर्तुगीज साधने :**

१) मराठ्याच्या इतिहासाची साधने - पोर्तुगीज दप्तर, खंड-२ संपा. पी.पी. पिसुर्लेकर, अनु.स.श.देसाई, खंड-३, संपा.ए.बी.द. ब्रांगास परेरा अनु.स.श.देसाई, म.रा.सा.स.मंडळ मुंबई.

**✻ इंग्रजी साधने :**

१) ढहश एसिश्रळीह ऋरलींीळशी ळ खविळर – १७ तश्रिीीशी.

२) एसिश्रळीह ठशलीवी ि डहर्ळींरक्षळ - २ तश्रिीीशी.

३) कच. एश्रश्रळीं। ज्ञीींि गहि (एव.) – ढहश क्लीींीू षि खविळर री ींश्रिव लू ळीी ीि क्लीींीळरीी तश्रि. ख ीं तिखखख.

४) इ. डशुळी ठळलश (एव.) – एळिसीरहिळर उरीरिंळलर, उीीस खीीलीळींळिीी.

**✻ परकीय प्रवास वर्णने :**

बार्थलमी कारे,झांबिस्त तोवेर्निए,तेव्नो झांद, जॉन फ्रायर, फ्रास्वा, बर्निए, निकोलाओ मानुचि, मार्टिन फ्रांस्वा, एडवर्ड टेरी, फ्रान्सिस्को पेलसार्ट इ.

**✻ पुराभिलेखागार :**

मुंबई पुराभिलेखागार, पुणे पुराभिलेखागार, कोल्हापूर पुराभिलेखागार, भा.इ.स.म.पुणे, शिवचरित्र कार्यालय, पुणे, डेक्कन कॉलेज पुराभिलेखागार, पुणे, बिकानेर रिकॉर्ड ऑफिस बिकानेर, नॅशनल लायब्ररी कोलकत्ता, हैद्राबाद स्टेट आर्काईव्हज, हैद्राबाद सेंट्रल रिकॉर्ड ऑफिस, सितामाऊ (जि.मंदसोर, मध्यप्रदेश), श्री.नटनागर शोध संस्था, सरस्वती महाल लायब्ररी तंजावर इत्यादी.

**✻ दुय्यम साधने :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सरकार जदुनाथ | - | औरंगजेबाचा इतिहास, शिवाजी आणि शिवकाल. |
| २) | सेन सुरेंद्रनाथ | - | फॉरेन बायोग्राफीज ऑफ शिवाजी. |
| ३) | डॉ.बाळकृष्ण | - | शिवाजी द ग्रेट खंड १ ते ४. |
| ४) | डफ ग्रॅन्ट | - | मराठ्यांचा इतिहास खंड १ ते ४. |
| ५) | ब्रिज किशोर | - | ताराबाई आणि तिचा काळ. |
| ६) | श्री.मेंहदळे ग.भा | - | श्री राजा शिवछत्रपती भाग १ व २ |
| ७) | श्री बेंद्रे वा.सी. | - | मालोजीराजे आणि शहाजी राजे, छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र. |
| ८) | श्री. सरदेसाई गो.स. | - | मराठी रियासत. |

**संशोधक**

**प्रा.शशिकांत महादेव मोहिते**
आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,आष्टा. ता.वाळवा,जि.सांगली.

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ.आर.डी. गंगथडे,** प्रमुख, इतिहास विभाग,
के.टी.पवार कॉलेज, हडोळती. ता.अहमदपूर, जि.लातूर.